बीएस-३ प्रकारातील वाहनांवरील बंदीनंतर शोरूम हाऊसफुल्ल

मुंबई : बीएस-३ वाहनांच्या ३१ मार्चनंतरच्या विक्रीवर ३१ मार्चनंतर बंदी घालण्यात आल्यानंतर वाहन निर्मिती क्षेत्रातील कंपन्यांकडून ग्राहकाना बंपर ऑफर दिल्यामुळे शोरूम हाऊसफुल झाल्या आहेत. हिरो मोटोकॉर्प, होंडा, टिव्हीएस या कंपन्यांकडून मोठ्या प्रमाणात सवलती जाहीर करण्यात आल्या आहेत. वाहन निर्मिती क्षेत्रातील कंपन्यांकडून बीएस-३ इंजिन असलेल्या वाहनांच्या विक्रीचा प्रयत्न सुरु आहे. आता चारचाकींची निर्मिती करणा?्या कंपन्यांकडूनही मोठी सूट देण्यात आली आहे.तर मोठी सवलत मिळत असल्याने ग्राहकदेखील मोठ्या प्रमाणात वाहनाची खरेदी करत आहेत.

दुचाकी निर्मिती करणा?्या बहुतांश कंपन्या १५ ते २० हजार रुपयांची सूट देत आहेत. तर कारनिर्मिती क्षेत्रातील कंपन्यांनी ५० हजार ते १ लाखापर्यंतची सवलत दिली आहे. काही कंपन्यांकडून ठराविक मॉडेल्सकडून १ लाखापेक्षाही अधिक किमतीची सूट दिली जाते आहे. टाटा, महिंद्रा कंपन्यांकडून गाड्यांच्या किमतीवर भरघोस सवलत देण्यात आली आहे.

टाटा इंडिगो इसीएसवर १ लाखांची सूट देण्यात आली आहे. तर टाटा सुमोवर दीड लाखांची सवलत आहे. महिंद्रा बोलेरोवर १ लाखांची तर महिंद्रा बोलेरो पिक अपवर ७० हजारांची सूट देण्यात आली आहे. टाटा झेनॉन या व्यावसायिक वापरासाठीच्या गाडीवर दीड लाखांची सवलत देण्यात आली आहे. त्यामुळे वाहनांच्या शोरुमबाहेर लोकांनी एकच गर्दी केल्याचे चित्र दिसून आले.

पुण्यात शोरूम्सना मंडईचे स्वरूप

पुणे (प्रतिनिधी) : जेथे, 'सर या बाजूने या, या गाडीचा मायलेज एवढा आहे, त्यासाठी तुम्हाला एवढे लोनही मिळेल...रंग ही हवा तो मिळेल,' अशा फॉर्मल बोलण्या-चालण्याची सवय असणाऱ्या गाडयांच्या शोरुमध्ये मात्र मोपेड सर्व गाड्या संपल्या आहेत... आता केवळ सीबीआर गाडी उपलब्ध आहे....कृपया त्यांनीच येथे थांबा... अशी अगदी मंडईत किंवा खुल्या बाजारपेठेत घोषणा करावी, अशी घोषणा शोरुमध्ये केली जात होती.

दुपारी १२ वाजेपर्यंत शोरुमबाहेर 'ऑउट ऑफ स्टॉक'चे बोर्ड झळकत होते. त्यामुळे बऱ्याच जणांना आज हात हलवतच बाहेर पडावे लागले. अगदी रोख रक्कम, धनादेश किंवा कार्ड हातातच घेऊन लोक शोरुमध्ये आले होते, साडेतीन मुहुर्तांपेक्षा गुरुवार, शुक्रवारच्या डिस्काऊंटच्या मुहुर्ताला जास्त महत्त्व आल्याचे पाहायला मिळाले. रंगासाठी अडून बसणारे ग्राहक आज स्किममधील गाडी आहे ना, मग कोणताही रंग चालेल, अशी उत्तरे देताना दिसत होते. तर स्वतः शोरुम मालकसुद्धा शोरुमध्ये गाडी खरेदीसाठी फॉर्म भरून देत होते.

अर्थात, कारणही तसेच होते... कारण आज 'बीएस /फखखख' या गाडीच्या सवलतीच्या विक्रीचा शेवटचा दिवस होता. सर्वोच्च न्यायालयाने बीएस /फखखख प्रकारच्या गाड्यांवर बंदीचे आदेश दिल्यानंतर सर्वच कंपन्यांनी बीएस /फखखख मॉडेलच्या गाड्यांवर भरघोस सूट मिळणार असल्याची ऑफर जाहीर केली. यात दुचाकीवर १० ते २५ हजार रुपयांची तर चार चाकींवर एक लाखाची सूट देण्यात आली. त्यामुळे अगदी ४० ते ५० हजार रुपयांत दुचाकी खरेदीची संधी ग्राहकांना मिळाली होती. गुरुवारी रात्री गाड्या संपल्याने विक्रेत्यांना अक्षरशः ग्राहकांना बाहेर ढकलून काढावे लागले. तर शुक्रवारी दुपारनंतर गाड्याच संपल्याने सकाळी गजबजलेले शोरुम रिकामे झाले होते. पिंपरी-चिंचवड व पुणे येथे बीएस /फखखख या गाड्या संपल्या असून आता शोरुमध्ये केवळ बीएस/फखा या गाड्याच विक्रीसाठी ठेवल्या गेल्या आहेत.

...आणि रत्नागिरीत दुपारपर्यंत शेकडो गाड्या संपल्या!

रत्नागिरी (प्रतिनिधी) : सर्वोच्च न्यायालयाने बीएस -३ इंजिन असलेल्या गाड्यांच्या खरेदी-विक्रीला बंदी घातल्यानंतर वाहन कंपन्यांनी या गाड्यांचा जणू सेलच सर्वत्र शोरूममध्ये लावला आणि भरघोस सूट मिळत असल्याने अनेकांनी अक्षरशः पैसे जमा करून या गाड्या विकत घेण्यासाठी धावाधाव केली. यामुळे शुक्रवारी दुपारपर्यंत जिह्यह्लातील सर्वच शोरूममधील सुमारे ३०० गाड्या खरेदी झाल्या.

सर्वोच्च न्यायालयाने बीएस -३ इंजिन असलेल्या गाड्यांच्या खरेदी-विक्रीला गुरुवारी बंदी घातल्याचा निर्णय दिला. प्रदूषण निर्माण करणाऱ्या या गाड्यांची १ एप्रिलपासून नोंदणी न करण्याचे आदेश न्यायालयाने दिल्यानंतर वाहन कंपन्यांनी ३० आणि ३१ मार्च या दोन दिवसांत आहेत; त्या गाड्या विकण्यासाठी त्यावर भरघोस सूट दिली. असे इंजिन असलेल्या जवळपास ६ लाख दुचाकींसह एकूण ८ लाखापेंक्षा अधिक नवी वाहने शोरुममध्ये उभी आहेत.

त्यात होंडाने स्कूटरवर तब्बल १३ हजार ५०० रुपये इतकी भरघोस सूट दिली आहे. तर मोटारसायकलवर तब्बल १८ हजार ५०० रुपयांचा सूट दिला आहे. ड्युएट, मेस्ट्रो एज, प्लेजर वर १२ हजार ५००, एचएफ डिलस्क सिरीज ५ हजार रुपये, स्प्लेंडर प्लस ५ हजार सूट, ग्लॅमर, एक्स्प्रो, आयस्मार्ट १०० वर ७ हजार ५०० होती. अशा विविध कंपन्यांच्या विविध गाड्यांवर घसघशीत सूट देण्यात येत होती. ही सूट २० ते ३० हजारांपर्यंत असल्याने अनेकांनी अक्षरशः इकडून तिकडून पैसे गोळा करून, उधार उसनवारी करून, शिलकीतील पैसे काढून या गाड्या बुक केल्या. या गाड्या पुन्हा विक्रीला काहीही अडचणही नाही. त्यामुळे काहींनी गुरुवारी तर काहींनी शुक्रवारी सकाळपासूनच ह्यिाल्ह्यातील विविध ठिकाणी असलेल्या शोरूममध्ये रांगा, वशिला लावून गाड्या खरेदी केल्या. उपप्रादेशिक परिवहन विभागाच्या अंदाजानुसार या दोन दिवसांत ह्यिाल्ह्यात सुमारे ३०० गाड्या खरेदी झाल्या असल्याची शक्यता आहे.

परळ-भोईवाड्यात शिवसेनेचे अंतर्गत राजकारण पेटले

मुंबई (प्रतिनिधी) : राज्यात आणि महापालिकेत सत्ताधारी असलेल्या शिवसेनेतील झुंडशाही अद्याप थांबलेली नाही. काही दिवस धुमसत असलेले परेल भोईवाड्यातील शिवसेनेचे अंतर्गत सूडाचे राजकारण पुन्हा एकदा पेटले आहे. पालिका निवडणुकीत उमेदवारीला विरोध केल्याचा राग मनात बाळगून माजी महापौर, नगरसेविका श्रद्धा जाधव यांचा समर्थक परेश देसाई याने उपशाखाप्रमुख प्रवीण फाटक यांच्यावर जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात प्रवीण फाटक गंभीर जखमी झाले आहेत.

उपशाखाप्रमुख फाटकांवर जाधव समर्थक देसाईचा प्राणघातक हल्ला

परले-भोईवाडा येथील शिवसेना शाखा क्रमांक २०२ मध्ये माजी नगरसेवक आणि प्रभाग समिती अध्यक्ष नंदू विचारे आणि विद्यमान नगरसेविका श्रद्धा जाधव असे दोन गटांत सूडाचे राजकारण आहे. नुकत्याच झालेल्या मुंबई महापालिका निवडणुकीत श्रद्धा जाधव यांना तिकीट देऊ नये यासाठी विचारे गटाने विरोध केला होता. सहा वेळा वेगवेगळ्या वॉर्डमधून नगरसेविका झालेल्या श्रद्धा जाधव यांची घराणेशाही अजून किती दिवस चालणार? असा सवाल करत त्याऐवजी शाखेतील कोणत्याही महिला कार्यकर्तीला तिकीट द्या, अशी मागणी शाखा क्र. २०२ मधील शिवसैनिक आणि तत्कालीन नगरसेवक नंदू विचारे यांनी केली होती. तरीही श्रद्धा जाधव यांनी शिवसेनेची उमेदवारी मिळवली आणि निवडणुकीत विजय मिळवला. मागील अनेक दिवस विचारे आणि जाधव गटात वाद धुमसत आहे. त्याचे पर्यावसन आता हाणामारीपर्यंत जाऊन पोहोचले आहे.

एक-दुसऱ्याच्या बदनामीसाठी हे दोन्ही गट खालच्या थराला गेले आहेत. राग मनात बाळगून माजी महापौर आणि नगरसेविका श्रद्धा जाधव आणि युवासेना पदाधिकारी पवन जाधव यांचा समर्थक असलेल्या परेश देसाई याने लाकडी दांड्याने उपशाखाप्रमुख प्रवीण फाटक यांच्यावर २८ मार्चला जीवघेणा हल्ला केला. या हल्ल्यात प्रवीण फाटक गंभीर जखमी झाले आहेत. या हल्ल्यामागे नगरसेविका श्रद्धा जाधव आणि पवन जाधव यांची फूस असल्याचा आरोप शिवसेना शाखा २०२ मधील शिवसैनिकांनी केला आहे. केईएम रुग्णालयात फाटक यांच्यावर उपचार करण्यात आले. फाटक यांनी याची किडवाईनगर पोलीस ठाण्यात तक्रार दिली. या तक्रारींवरून परेश देसाई याला पोलिसांनी अटक केली.

छोट्या जाहिराती

नावात बदल

I have changed my Name from **Patel Vali Bharat** to **Gothi Valiben Bharat** as per affidavit Dated 29/03/2017

पाहिजेत

DFV PRODUCTION
हिंदी फिल्म मध्ये कामा साठी आर्टीस्ट मुले मुली पाहिजेत
100 % कामाची गॅरंटी
वयाची अट नाही
09967899988
09967720777

प्रहार ,मुंबई
वाचकांना विनम्र सूचना
प्रहार वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणा-या विविध जाहिरातींतील मजकुराची शहानिशा करूनच वाचकांनी त्यासंबंधी आर्थिक व्यवहार करावा. जाहिरातीत आपल्या उत्पादनाच्या संदर्भात वा सेवेच्या संदर्भात जाहिरातदार जे दावे करतात त्याची 'प्रहार' वृत्तपत्र समूह कोणतीही हमी घेत नाही. जाहिरातीत करण्यात आलेल्या दाव्यांची पूर्तता जाहिरातदारांकडून न झाल्यास त्याच्या परिणामाबद्दल 'प्रहार' वृत्तपत्र समूहाचे मुद्रक, प्रकाशक, संपादक व मालक हे जबाबदार राहणार नाहीत, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

आराध्यासाठी सक्षम फाऊंडेशनची साद!

ठाणे : सक्षम फाऊंडेशन व शिवशक्ती मित्रमंडळ यांच्या वतीने आयोजित 'अवयवदान जनजागृती' अभियानात आराध्य मुळे या चार वर्षीय मुलीला हृदयदान करण्यासाची साद ठाणेकरांनी घातली. हे अभियान २ मार्च रोजी ठाणे येथील मनोरमानगर येथे संस्थेच्या अध्यक्ष ज्योती संतोष कदम यांच्या पुढाकाराने आयोजित करण्यात आले होते. या अभियानादरम्यान, काढण्यात आलेल्या रॅलीत ठाण्याच्या महापौर मीनाक्षी शिंदे, नगरसेविका व परिषा सरनाईक तसेच मनोरमानगरमधील सर्व स्थानिक नगरसेवक मधुकर पावसे, भूषण भोईर आदी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. आराध्याला हृदयाचा आजार असल्याने तिला हृदय प्रत्यारोपणाची गरज असून; त्यासाठी सोशल मीडियासह राज्यभरात 'सेव आराध्य अभियान' राबवले जात आहे.

मध्य रेल्वेच्या अपर महाप्रबंधकपदी विशाल अग्रवाल!

मुंबई : मध्य रेल्वेचे अपर महाप्रबंधक म्हणून विशाल अग्रवाल यांनी पदभार स्वीकारला आहे. अग्रवाल हे अलाहाबाद विश्वविलयाचे विद्यार्थी आहेत. याआधी ते मध्य रेल्वेमध्येच मुख्य वाणिज्य प्रबंधक म्हणून कार्यरत होते. १९८१च्या बॅचचे वरिष्ठ अधिकारी असलेले विशाल अग्रवाल यांना रेल्वेच्या विविध पदांचा अनुभव आहे. अग्रवाल यांनी वीस वर्षांपूर्वी आपल्या रेल्वे सेवेला सुरुवात केली होती. यात आसनसोल आणि धनबाद कोळसा क्षेत्राच्या सेवेचाही समावेश आहे. त्यांनी हावडा मंडलमध्येही सेवा बजावलेली आहे. तिथे ते उपनगरीय सेवेसाठी कार्यरत होते.

पान १ वरून

आमदारांचे निलंबन आज मागे ?

विधानसभेत अर्थसंकल्प सादर होत असताना विरोधी पक्षांच्या सदस्यांनी वेलमध्ये उतरून घोषणा दिल्यामुळे १९ सदस्यांना निलंबित करण्यात आले आहे. विधिमंडळाच्या इतिहासात पहिल्यांदा आमदारांना निलंबित करण्यासाठी विशेष बैठक बोलावण्यात आली. त्यासाठी सत्तेमधील घटक पक्ष असलेल्या शिवसेनेलाही अंधारात ठेवण्यात आले. त्या अन्यायाविरोधात सर्व विरोधी पक्षांच्या सदस्यांनी सभागृहात न येता शेतकरी संघर्ष यात्रा काढली आहे. सभागृहात न्याय मिळत नाही, म्हणून आम्ही आता लोकांत जाऊन कर्जमाफीचा मुद्दा मांडत आहोत. विधानसभेत विरोधी पक्षांचे सदस्य नसले तरी विधान परिषदेचे कामकाज मात्र करण्याचा आमचा प्रयत्न आहे; परंतु अनिल गोटे हे वारंवार विधान परिषदेबद्दल वादग्रस्त विधाने करत आहेत. या सभागृहातही गोंधळ होऊन येथे कामकाज होऊ नये, यासाठी हा प्रयत्न चालला आहे काय, असा प्रश्न निर्माण होतो, असे तटकरे म्हणाले.

सभागृहात उपस्थित असलेले संसदीय कामकाजमंत्री गिरीष बापट यांनी सरकारची भूमिका स्पष्ट करताना सरकार गोटे यांच्या मताशी सहमत नाही, असे सांगितले; मात्र त्यांनी १९ आमदारांच्या निलंबनाचे समर्थन केले. त्यावरून विरोधक आक्रमक झाल्याने सभापती रामराजे निंबाळकर यांनी सभागृहाचे कामकाज अर्ध्या तासासाठी तहकूब करण्यात आले. दरम्यान, गटनेत्यांची बैठक सभापती आणि मुख्यमंत्र्यांच्या उपस्थित झाली.

सभागृहाचे कामकाज पुन्हा सुरू झाले तेव्हा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सभागृहात आले. त्यांनी गोटे यांच्या विधानाबद्दल नापसंती व्यक्त करत असतानाच आमदारांच्या निलंबनाबद्दलही आपली भूमिका स्पष्ट केली. ते म्हणाले की, विरोधक आणि सत्ताधारी लोकशाहीचे दोन चाके आहेत, हे आम्हाला मान्य आहे. विरोधकांना सभागृहाबाहेर ठेऊन काम करताना आम्हालाही आनंद होत नाही; परंतु प्रसंगानुसार कधी कधी असे निर्णय घेतले जातात. यापूर्वीही तसे निर्णय घेतले गेले आणि सामोपचाराने ते बदलण्यातही आले. तसेच १९ आमदारांच्या निलंबनाबाबतही सरकारची भूमिका लवचिक असून त्याबाबत उद्या, शनिवारी विधान सभेत सकारात्मक निर्णय घेण्यात येईल, असे सांगत मुख्यमंत्री फडणवीस यांनी आमदारांचे निलंबन रद्द करण्याचे संकेत दिले.

तात्याराव लहान अडचणीत

या चाचण्या केईएम इस्पितळात उपलब्ध असल्याचेही सांगण्यात आले होते. ह्यिकेईएमह्लमधील पथक तुरुंगात येऊन चाचणी करण्यात तयार होते, परंतु भुजबळ यांनी तुरुंगात चाचणी करून घेण्यास नकार दिला.

याशिवाय थॅलिअम स्कॅन चाचणी उपलब्ध नसल्याचेही केईएम इस्पितळाने कळविले. त्यामुळे २६ ऑक्टोबर रोजी विशेष न्यायालयाने थॅलिअम स्कॅन खासगी, तर उर्वरित चाचण्या जे. जे. इस्पितळात करण्यास परवानगी दिली. त्यानुसार दोन चाचण्या झाल्यानंतर भुजबळ यांना २ नोव्हेंबर रोजी जे. जे. इस्पितळातून बॉम्बे हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले.

या सर्व कालावधीत लहाने यांनी भुजबळ याना विशेष सहकार्य केल्याचे दमानिया यांनी म्हटले आहे.

सभागृहाचा अवमान नको

ज्येष्ठांच्या सभागृहाच्या माध्यमातून वेगवेगळ्या विषयांवर मते आणि चर्चा होतात, एका समृद्ध लोकशाहीसाठी हे आवश्यक आहे. विधानसभा सदस्य अनिल गोटे यांनी केलेल्या विधानाचे राज्य सरकार म्हणून आणि वैयक्तिक मी समर्थन करत नाही. या निवेदनाच्या माध्यमातून मी सभागृहातील सदस्यांना आश्वासित करतो की, सभागृहातील सदस्यांचा सन्मान राखला जाईल. विधान परिषद सदस्य सर्वश्री सुनील तटकरे, भाई जगताप, नारायण राणे, जयंत पाटील यांनी विधानसभा सदस्य अनिल गोटे यांनी केलेल्या विधानाबद्दल आक्षेप घेत राज्य सरकारने याबाबत निवेदन देण्याची मागणी केली होती.

नव्या आर्थिक वर्षात होणार मोठे बदल

त्या रकमेवर पेनल्टी शुल्क द्यावे लागणार आहे. संसदेत सादर प्रस्तावानुसार जेवढी रोख रक्कम रोख घेण्यात आली आहे तेवढीच पेनल्टी असेल. किमान खातेशिल्लक नसल्यास भूर्दंड

ग्राहकांच्या खात्यात किमान खातेशिल्लक नसल्यास दंड भरावा लागू शकतो. मात्र हा दंड किरकोळ असणार आहे. बँकेच्या सेवेनुसारच दंड लावला जाईल. मेट्रो सिटीमधील ग्राहकांना मिनिमम ५००० रुपये खात्यात ठेवावे लागणार आहेत. शहरी ग्राहकांसाठी ही मयार्दा ३००० रुपये, निम शहरीभागात २००० रुपये असणार आहे.

सवलतीत राजधानी-शताब्दीने प्रवास...

भारतीय रेल्वेच्या विकल्प योजनेनुसार मेल आणि एक्स्प्रेस प्रवाशांना शताब्दी आणि राजधानीसारख्या लक्झरी ट्रेनमधून प्रवास करता येणार आहे. याचा फायदा वेटिंग तिकीट असलेल्या प्रवाशांना होणार आहे. प्रवाशांनी तिकीट बुकींग करतानाच याची माहिती दिली पाहिजे, की विकल्प योजनेचा लाभ घेऊ इच्छितो. ही सुविधा सध्या ऑनलाइन तिकीट बुकिंगसाठी आहे. लवकरच तिकीट काऊंटरवही 'विकल्प' सुरु होणार आहे.

कार, बाईक, आरोग्य विमा महाग...

एक एप्रिलपासून कार, बाइक आणि आरोग्य विमा महाग होणार आहे. ह्यिआयआरडीएआयह्लने याला मंजूरी दिली आहे.

बी एस-३ वाहनावर बंदी...

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार, एक एप्रिल पासून बीएस-३ मानकांच्या वाहन विक्रीवर बंदी आणली जाणार आहे. त्यामुळे बीएस -४ वाहनाच्या किमती वाढू शकतात.

ज्येष्ठ नागरिकाना सवलत...

ज्येष्ठ नागरिकांना एक एप्रिलपासून रेल्वे तिकीट बुक करण्यासाठी आधार कार्डची आवश्यकता राहाणार नाही. रेल्वे मंत्री सुरेश प्रभु यांनी लोकसभेत ही माहिती दिली होती.

एच-१ बी व्हिसासाठी अर्ज...

अमेरिका २०१८ साठी एच-१ बी व्हिसासाठी 3 एप्रिलपासून अर्ज स्वीकारण्यास सुरुवात करणार आहे. ट्रम्प प्रशासन या वर्षी त्यांच्या व्हिसा नियमांमध्ये काही बदल करु शकते.

आयकर रिटर्नचे इ-फायलिंग...

प्राप्तीकर परतावा (इनकम टॅक्स रिटर्न) इ-फायलिंगने भरणे अधिक सोपे होणार असून शनिवारपासून नवा सरल फॉर्म भरावा लागेल. हा फॉर्म अधिक सुटसुटीत आणि सोपा असणार आहे.

लोकशाहीचा खून करू नका!

लोकशाहीत विरोधक आणि सत्ताधारी पक्ष यांचे महत्त्व सारखेच आहे; परंतु शेतकऱ्यांसाठी कर्ज माफी मागितली म्हणून १९ विधानसभेच्या सदस्यांना निलंबित करण्यात आले आहे. त्यावेळपासून विरोधी पक्षांचे सदस्य विधानसभेत नाहीत. तरीही कामकाज रेटून नेले जात आहे.

खरे तर हे अर्थसंकल्पीय अधिवेशन आहे. या अधिवेशनात अर्थसंकल्प मांडला जातो, त्यावर सविस्तर चर्चा होते. सत्ताधारी आणि विरोधक त्यावर आपले भाष्य करीत असतात; परंतु अर्थसंकल्पात जो सरकारने शब्दांचा खेळ केला आहे, तो लोकांसमोर येऊ नये यासाठी जाणीवपूर्वक विरोधी पक्षांच्या सदस्यांना सभागृहाबाहेर ठेवले आहे काय, अशी शंका मनात निर्माण होते. विधान सभेतील सदस्यांना गोंधळ घातल्याचा ठपका ठेऊन सभागृहाबाहेर ठेवले आहे. विधान परिषदेतही तसेच व्हावे म्हणून अनिल गोटे वारंवार या सभागृहाबद्दल वादग्रस्त विधाने करत आहेत का, अशी शंका निर्माण होते, असा टोला लगावून राणे म्हणाले की, अर्थ संकल्पावर चर्चा होणार नसेल, वेगवेगळ्या प्रस्तावांवर चर्चा होऊन कष्टकरी, कामगार, शेतकरी यांना न्याय मिळणार नसेल या अधिवेशनाचा काय उपयोग, असेही राणे म्हणाले.

विरोधक हे लोकशाहिचा महत्त्वाचा घटक आहे. सभागृहाचे कामकाज सुरळीत चालावे यासाठी १९ आमदारांचे केलेले निलंबन मागे घ्यावे, असे आवाहन नारायण राणे यांनी केले.

किती आत्महत्या झाल्यावर शेतकऱ्यांना कर्जमाफी?

या सरकारचे खायचे दात आणि दाखवायचे दात वेगळे असून यांच्या मनात नथुराम आहे, अशी जळजळीत टीका पवार यांनी केली. समाजवादी पक्षाचे प्रदेशाध्यक्ष आमदार अबू आझमी यांनीही सरकारवर जोरदार टीका केली. लोकांना फसवून त्यांची मते घेऊन मोदी पंतप्रधान झाले, पण लोकांचे अच्छे दिन काही आले नाहीत. भाजपा सरकारच्या काळात भ्रष्टाचार वाढला असून विरोधकांचा आवाज दाबून हिटलरशाही आणण्याचा प्रयत्न सुरू आहे. शेतकऱ्यांचा सातबारा कोरा केल्याशिवाय हा संघर्ष थांबणार नाही, असा इशारा त्यांनी सरकारला दिला.

दरम्यान, तिसऱ्या दिवशी संघर्षयात्रा विदभार्तील सहा जिल्ह्यांतून मार्गक्रमण केल्यानंतर हिंगोलीमार्गे मराठवाड्यात दाखल झाली. वाशिम जिल्ह्यातील कारंजा लाड, मालेगाव, मंगरूळपीर आदी ठिकाणी संघर्षयात्रेचे शेतकऱ्यांनी मोठ्या उत्साहात स्वागत केले. मार्गातील खेड्यापाड्यांतही अनेक शेतकरी रस्त्यावर संघर्ष यात्रेच्या प्रतीक्षेत उभे होते.

मराठवाड्यात सात जिल्ह्यांत प्रवास करून ही यात्रा पश्चिम महाराष्ट्रात जाणार आहे. या संघर्षयात्रेत काँग्रेस, राष्ट्रवादी काँग्रेस, शेकाप, समाजवादी पक्ष, पिपल्स रिपब्लिकन पार्टी एमआयएम या सर्व विरोथी पक्षांचे प्रमुख नेते सहभागी झाले आहेत.

वाणिज्य वृत्त

सचिन तेंडुलकरच्या डिजिटल इनिंगला सुरुवात

मुंबई : ख्यातनाम क्रिकेट पटू सचिन तेंडुलकरच्या हस्ते ह्य१०० एमबीह्ल या अनोख्या डिजिटल अप्लिकेशनचे अनावरण करण्यात आले.

या निमित्तानं त्याच्या डिजिटल इनिंगला सुरुवात झाली. १०० एमबी हे एक असे अप आहे जे, भारतातील सर्वात सर्जनशील डिजिटल तंत्रज्ञान कंपनी असलेल्या जेटसिंथसिस तर्फे इन्फोसिसचे सह-संस्थापक क्रिस गोपालकृष्णन यांच्याबरोबर विकसित करण्यात आले आहे. जेटसिंथसिसचे अध्यक्ष, व्यस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी राजन नावानी यांनी ख्यातनाम क्रिकेटपटू सचिन तेंडुलकर आणि एसआरटी स्पोर्ट्स मॅनेजमेंटचे (एसआरटीएसएम) मुख्य कार्यकारी अधिकारी मृणमय मुखर्जी यांच्या प्रमुख उपस्थितीत हे जाहीर केले. ह्य१०० एमबीह्ल हा जेटसिंथसिस आणि एसआरटीएसएम यांचा एकत्रित उपक्रम आहे ज्याद्वारे १०० या अंकाचे पुनर्वर्णन केले गेले आहे. ह्य१०० एमबीह्ल या नावातला १०० हा आकडा सचिनने आंतरराष्ट्रीय क्रिकेट मध्ये नोंदवलेल्या १०० शतकांना वाहिलेला आहे तर, ह्यएमबीह्लही अक्षरे ह्यमास्टर ब्लास्टरह्ल या त्याच्या उपाधीशी संबंधित आहेत.

टाटा पॉवरच्या माहसीर संवर्धन मोहिमेत १५०० मत्स्यशिलेदार सहभागी

मुंबई : टाटा पॉवर ही देशातील सर्वात मोठी वीज एकात्मिक कंपनी आपल्या स्थापनेपासूनच इको-जिर्णोद्धार आणि इको-विकासासाठी कायम अग्रेसर राहिली आहे. माहसीर नावाने ओळखल्या जाणाऱ्या माशांच्या चिंताजनक प्रजातींच्या संवर्धनासाठी तसेच त्यांचे पुनर्वसन करण्याचा कार्यक्रम टाटा पॉवरने १९७० मध्येच हाती घेतला होता. त्यावेळी फक्त एकहाती राबवण्यात आलेल्या या कार्यक्रमाला नंतर टाटा पॉवरच्या ह्यअक्ट फार माहसीरह्लया उपक्रमामुळे राष्ट्रीय मोहिमेचे स्वरूप प्राप्त झाले. या मोहिमेला गती देताना लव्हली प्रोफेशनल विद्यापीठाचे जवळपास १५०० पेक्षा जास्त विद्यार्थी आणि शिक्षक ह्यअक्ट फॉर माहसीरह्लया कार्यक्रमात सहभागी झाले आहेत. या १५०० पेक्षा जास्त मत्स्यशिलेदारांनी माहसीर वाचवण्यासाठी पुढाकार घेतला असून राष्ट्रीय स्तरावर जवळपास ४३०० मत्स्यशिलेदार या उपक्रमात सहभागी झाले आहेत.

कॅनन इंडियाच्या मुंबईत पंधराव्या स्टोअरची स्थापना

मुंबई -भारतातल्या डिजीटल इमेजिंग क्षेत्रातली आघाडीची कंपनी असलेल्या कॅननने मुंबईत त्यांचे पंधरावे कॅनन इमेज स्क्वेअर (सीआयएस) स्टोअर स्थापन केले आहे. हे वैशिष्ट्यपूर्ण सीआयएस स्टोअर नवी मुंबई येथील नेरूळ नोड येथे युनिट क्रमांक 61, पहिला मजला, सीवूड्स ग्रॅण्ड सेंट्रल, सेक्टर 40 येथे उघडण्यात आले आहे. या सीआयएस स्टोअरमध्ये कोणतेही उत्पादन प्रत्यक्ष विकत घेण्यापूर्वी त्या उत्पादनाचा प्रत्यक्ष वापर करून पाहण्याची संधी ग्राहकांना मिळणार असून इमेजिंग आणि प्रिंटींगचा स्वतः अनुभव घेतल्यानंतरच ही उत्पादने विकत घेण्याची सोय ग्राहकांसाठी येथे करण्यात आली आहे. या स्टोअरमध्ये छायाचित्रण आणि घरच्या घरी प्रिंटींग करण्यासाठीची विविध उत्पादने उपलब्ध असून यात इंजेट आणि लेझर प्रिंटर्स तसेच, कार्ट्रिजच्याही व्यापक रेंजचा समावेश आहे.

ड्राय पोर्टसमुळे वाढणार बंदर आणि प्रदेशातली दरी

बंदरांमुळे व्यापार आणि औद्योगिक क्षेत्रांचं जीवन सुसह्लबनतं. बंदरापासून जवळ असल्यास व्यापा?्याला त्याच्या संबंधित व्यापारामध्ये यश मिळवणं सोपं जातं. असं असलं तरी आपल्या देशातले अनेक प्रांत या सुविधेपासून वंचित आहेत कारण राज्यातला प्रत्येक प्रदेश किनारी भागातल्या बंदरांशी जोडलेला आहेच असं नाही. या प्रश्नावरचा तोडगा म्हणून ड्राय पोर्टच्या पयार्याला झपाट्याने स्वीकृती मिळत आहे. ड्राय पोर्ट हे जमिनीवरचं आंतरविभागीय टर्मिनल असतं जे थेटपणे समुद्री बंदराला जाणा?्या रस्ते किंवा रेल्वेमागार्शी जोडलेलं असतं. समुद्रमागार्ने येणारा माल जमिनीवरच्या सुनिश्चित ठिकाणी पोहोचवण्यासाठी हे केंद्र कार्यरत असतं.

'वेस्टिंगहाऊस'च्या दिवाळखोरीचा भारताला लाभ...

मुंबई : 'तोशिबा'ची सहकंपनी असलेल्या ह्यवेस्टिंगहाऊसह्लच्या दिवाळखोरीमुळे भारताचे महागड्या आणि निरर्थक मालमत्तांबाबत अब्जावधी डॉलर्सचे होणारे नुकसान टळणार आहे. भारत-अमेरिकातील २००८ च्या अणुकरार नियमांनुसार भारतामध्ये अणुऊर्जा निर्मितीसाठी निश्चित केलेल्या चार कंपन्यापैकी एक कंपनी म्हणून वेस्टिंगहाऊसचा समावेश होता. या उपक्रमास लागणारा निधी भारतामधून गोळा केला जाणार होता. ?वेस्टिंगहाऊसतर्फे एपी १००० डिझाईनचे सहा प्रकल्प आंध्र प्रदेशातील कोव्वाडा येथे उभारण्यात येणार होते. त्यासाठी या कंपनीने तंत्र-व्यावसायिक ऑफर दिली होती. मात्र वेस्टिंगहाऊसच्या दिवाळखोरी अजामुंळे या प्रकल्पाला फटका बसणार आहे. मात्र ही घडामोड भारतासाठी लाभदायक असून आयात करण्यात येणा?्या अणुऊर्जा खचार्चा आपल्याला आता आढावा घेता येणार आहे.

पुण्यातील कॉलेजला मिळाली भारतातील पहिली 'इंक लॅब'

पुणे : सिजवर्क इंडिया आणि परख अग्रो यांच्या संयुक्त विद्यमाने भारतातील पहिल्या आणि अनोख्या अशा इंक लॅबची स्थापना पीव्हीजी कॉलेज ऑफ इंजिनियरींग अन्ड टेक्नॉलॉजीच्या प्रिटिंग इंजिनियरींग डिपार्टमेंटमध्ये करण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या माध्यमातून प्रिंटिंग इंजिनियरींग डिपार्टमेंट मधील विद्यार्थ्यांना शिक्षण देऊन बाजारपेठेत भविष्यात कुशल मनुष्यबळ निर्माण करण्याचा प्रयत्न केला जाणार आहे. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांना थेट प्रशिक्षण हे प्रकल्पांच्या माध्यमातून सबस्ट्रेट इंक इंटरॅक्शनच्या माध्यमातून या समस्येवर उपाय शोधण्याबरोबरच बाजारपेठेला सध्या हवे असलेले मनुष्यबळ निर्माण होण्याबरोबरच त्यांना या इंक लॅबच्या माध्यमातून कौशल्यांचाही विकास करणे शक्य होणार आहे.

भारत-इस्त्रायलची शैक्षणिक भागीदारी

मुंबई : मुंबई विद्यापीठात 'गेट वे हाऊस'च्या वतीने भारत आणि इस्त्रायली शिक्षणप्रेमींसाठी एकदिवसीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात भारत आणि इस्त्रायलमधील मीडिया, जनसंपर्क यांची भागीदारी आणि शिक्षण संस्थांचे महत्त्व याबाबत विचार करण्यात आला. या चर्चासत्राचे फलित म्हणजे मुंबई विद्यापीठात भारत-इस्त्राईल अभ्यास केंद्राची स्थापना करण्यात आली आहे. हे नवीन अभ्यासक्रम मुंबई विद्यापीठ आणि इस्त्रायलमधील तेल अवील विद्यापीठाशी जोडण्यात आले आहे. भारताचे पंतप्रधान मा. नरेंद्र मोदी आगामी जून-जुलै महिन्यात इस्त्रायलच्या दौऱ्यावर जाणार आहेत. त्या पार्श्वभूमीवर या अभ्यास केंद्राला महत्त्व आले आहे.